| MHRT030016182021 | दाखल तारीख | -- | २५/१०/२०२१ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | -- | २५/१०/२०२१ |
| | निकाल तारीख | -- | १०/०८/२०२६ |
| | कालावधी | -- | वर्षे महिने दिवस<br>०४ ०९ १६ |

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद (I) )**

**रत्नागिरी येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी – श्रीमती व्ही.व्ही.पाटील)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१८५/२०२१** **निशाणी क्र.३४**

| | |
|---|---|
| **खटला क्रमांक** | **नियमित फौजदारी खटला क्र.१८५/२०२१** |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलिस ठाणे अथवा राज्य उत्पादन शुल्क** | रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गु.र.क्र.४६४/२०२१ |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे पोलीस निरीक्षक,**<br>रत्नागिरी शहर पोलीस ठाणे. |
| **प्रतिनिधीत्व** | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी. ए. सावंत.** |
| **विरुध्द** | |
| **आरोपी** | **कुंदन नंदकुमार चव्हाण**<br>वय सु. – ३४ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>रा. घर नं.६०५, जांभुळ फाटा, मिरजोळे,<br>ता. जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | **विद्वान विधीज्ञ श्री. उन्मेश मुळये/ श्री. ए. यु. डोंगरे.** |

**भाग 'ब'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ (II))**

| | |
|---|---|
| गुन्हा तारीख | २६/०९/२०२१ |
| पहिली खबर तारीख | २६/०९/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २५/१०/२०२१ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | १८/०७/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०/०८/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागू असल्यास | -- |

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर खुले केल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान निरुद्ध केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कुंदन नंदकुमार चव्हाण | आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस दिली. | २८/०९/२०२१ | भा.दं.वि.क. ३२४, ५०४, ५०६. | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

**भाग क**

**(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ (III))**

## अ. साक्षीदारांची यादी

### अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | यश संदीप आडमकर | ३० | फिर्यादी |

### बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| – | – | – | –– |

### न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

## ब. अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### बचाव पक्षातर्फे मान्य केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ३१ | घटनास्थळ पंचनामा |
| ०२ | ३२ | वैदयकीय प्रमाणपत्र |

### बचाव पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन कागदोपत्री निशाण्यांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ----- | एक २ फुट ०३ इंच लांब लाकडी फळीचा रीपचा तुकडा तीन बाजू समान ०३ इंच मापाच्या एका बाजुचा तुकडा मध्यभागी तुटलेला जुना वापरता किं.सु.००.००/ |

............................................

## न्यायनिर्णय

(**घोषीत दिनांक १०.०८.२०२६**)

**१.** आरोपीच्या विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

**२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहेः-**

अभियोगपक्षातर्फे फिर्यादी यश संदीप आडमकर याने दिनांक २६/०९/२०२१ रोजी अशा आशयाची फिर्याद नोंदविली आहे की, फियादी व आरोपी हे दोघेही रिक्षा चालक असून ते रत्नागिरी रेल्वे स्टेशन येथील रिक्षा स्टॅण्डला रिक्षा उभी करुन व्यवसाय करतात. फिर्यादी यांनी आरोपी यांची रिक्षाची स्टेफनी घेतली होती ती फिर्यादी यांनी आरोपीस अद्यापर्यंत परत केलेली नव्हती याचा राग आरोपी यांना होता. दिनांक २६/०९/२०२१ रोजी १८.३० वाजताचे सुमारास मौजे मिरजोळे, रत्नागिरी रेल्वे स्टेशन

रिक्षा स्टॅण्ड ता. जि. रत्नागिरी येथे यातील आरोपीने फिर्यादी यास 'माझ्या रिक्षाची स्टेफनी कधी देणार' असे बोलून फिर्यादीस हाताचे थापटाने मारहाण करुन तसेच एक लाकडाची रिप घेवून फिर्यादीचे उजवे कानाचे पाठीमागील बाजूस तसेच डोक्यावर, डाव्या हाताचे मनगटावर मारहाण करुन जाणीवपूर्वक दुखापत केलेली आहे तसेच शिवीगाळ करुन 'तुझ्या घरातील माणसांना मारेन' अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात आरोपीचे विरुद्ध लेखी फिर्याद दाखल केली.

३. त्या अनुषंगाने, रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात गु.र.क्र.४६४/२०२१ दाखल झाला. त्याचा तपास पो.हे.कॉ./७१७ एस. ए. गायकवाड यांनी केला. तपासकामी तपास अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, घटनास्थळाचा नकाशा काढला, मुद्देमाल जप्त करुन पावती तयार केली व साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

४. आरोपी प्रस्तुतकामी न्यायालयात उपस्थित झालेनंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीचे विरुद्ध निशाणी क्र.०८ अन्वये, भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये दंडनिय अपराध केल्याबाबत, दोषारोप निश्चित केला. त्यामधील मजकूर आरोपीला वाचून आणि समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली. आरोपीचे विरुद्ध कोणतीही गुन्हेविषयक परिस्थिती अभिलेखावर उपलब्ध न झाल्यामुळे निशाणी क्र.१ वरील दि.१०/०८/२०२६ रोजीचे आदेशान्वये आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

५. प्रस्तुत प्रकरणातील प्रथम खबरी अहवाल, अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधिज्ञ यांचे युक्तीवादावरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे

नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २६/०९/२०२१ रोजी १८.३० वाजताचे सुमारास मौजे मिरजोळे, रत्नागिरी रेल्वे स्टेशन रिक्षा स्टॅण्ड ता. जि. रत्नागिरी येथे आरोपीने फिर्यादीस हाताचे थापटाने मारहाण करुन एक लाकडाची रिप घेवून फिर्यादीचे उजवे कानाचे पाठीमागील बाजूस तसेच डोक्यावर, डाव्या हताचे मनगटावर मारहाण करुन जाणीवपूर्वक दुखापत केली, त्यावेळी लाकडी रिप हे हत्यार म्हणून वापरले तर मृत्यू येवू शकतो हे माहित असताना देखील त्याने ती मारुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली व आरोपीने भा.दं.वि.क. ३२४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीला त्याचे हातून सार्वजनिक शांतता भंग व्हावी किंवा अन्य कोणतातरी अपराध घडावा या उद्देशाने शिवीगाळ करुन त्याचा इच्छापुर्वक अपमान केला व आरोपीने भा.दं.वि.क. ५०४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीला 'तुझ्या घरातील माणसांना मारेन' अशी गुन्हेगारी स्वरुपाची धमकी दिली व आरोपीने भा.दं.वि.क. ५०६ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ४ | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत : –**

६. उपरोक्त तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने वारंवार होणारे विवेचन टाळण्यासाठी मी उपरोक्त तिन्ही मुद्दे एकत्रितपणे विवेचित करीत आहे व त्यावरील मी माझे निष्कर्ष नोंदवित आहे.

७. अभियोगपक्षाचे कथनानुसार, दिनांक २६/०९/२०२१ रोजी १८.३० वाजताचे सुमारास मौजे मिरजोळे, रत्नागिरी रेल्वे स्टेशन रिक्षा स्टॅण्ड ता. जि. रत्नागिरी येथे यातील आरोपीने फिर्यादीस हाताचे थापटाने मारहाण करुन तसेच एक लाकडाची रिप घेवून फिर्यादीचे उजवे कानाचे पाठीमागील बाजूस तसेच डोक्यावर, डाव्या हताचे मनगटावर मारहाण करुन जाणीवपूर्वक दुखापत केलेली आहे तसेच शिवीगाळ करुन 'तुझ्या घरातील माणसांना मारेन' अशी धमकी दिली व त्याअन्वये आरोपीने भा.द.वि.कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा केला आहे.

८. अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर सादर केलेल्या पुराव्याचे विवेचनाला सुरुवात करणेपूर्वी काही गोष्टींची नोंद घेणे महत्वपूर्ण ठरते. त्यामध्ये फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान आपापसात तडजोड झाली आहे. तशा आशयाची पुरशीस (नि.क्र.२९) अभिलेखावर दाखल आहे. त्यानंतर अभियोग पक्षातर्फे फिर्यादी यश (अ.सा.क्र.१) याची साक्ष (नि.३०) नोंदवून झाल्यानंतर पुरावा बंदची पुरशीस (नि.क्र.३३) दाखल करणेत आली. या पार्श्वभुमीवर अभिलेखावरील पुराव्याचे साकल्याने खालीलप्रमाणे अवलोकन केले आहे.

९. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करणेसाठी फिर्यादी यश (अ.सा.क्र.१) याने त्याचे साक्षीमध्ये (नि.३०) असे नमुद केले आहे की, आरोपी त्याचा मित्र आहे. दि.२६/०९/२०२१ रोजी त्यांचेमध्ये फक्त वादावादी झाली होती, त्या व्यतिरिक्त

काहीही झाले नाही. पोलीसांकडे तो तक्रार द्यायला गेला होता. पोलीसांना त्याने आरोपी व त्याचेमध्ये वादावादी झाल्याचे सांगितले होते. तक्रार त्याने वाचलेली नसून त्यावर फक्त सही केलेली आहे. सदर साक्षीदाराने दि.२६/०९/२०२१ रोजीचे जबाबावरील सही त्याची असल्याचे नमूद केले आहे परंतू, त्यामधील मजकूराबाबत कोणतेही पूरक विधान केलेले नाही. त्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्याला उलटतपासाच्या स्वरुपात सुचक प्रश्न विचारले असता त्याने दि.२६/०९/२०२१ रोजी रेल्वेस्टेशन येथे त्याची व आरोपीची वादावादी झाली असल्याचे मान्य केले परंतू, आरोपीने त्याला लाकडी रिप व हाताने त्याचे कानाच्या पाठीमागे, डोक्यावर, डावे हाताचे मनगटावर मारहाण केली व त्यामुळे त्याला दुखापत झाली व त्याने रुग्णालयात जावून उपचार घेतले तसेच आरोपीने त्याचे घरातील माणसांना मारेन अशी धमकी दिली व तशा स्वरुपाची तक्रार त्याने पोलीस स्टेशनला दिली हा मजकूर स्पष्टपणे नाकारला असल्याचे दिसते. थोडक्यात, त्याने अभियोग पक्षास समर्थन नाकारले. त्याचे साक्षीतुन अभियोग पक्षास त्यांचे कथनास पूरक असा कोणताही पुरावा समोर आलेला नाही.

**१०.** आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.३१) व फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.३२) हे मान्य व कबूल करण्यात आले. परंतु, सदर घटनास्थळावर वैद्यकीय प्रमाणपत्रात नमूद दुखापती या फिर्यादीला आरोपीने मारहाण केल्यामुळे झाल्या असा मात्र निष्कर्ष काढता येणार नाही. एकंदरीत, अभियोग पक्षातर्फे फिर्यादी यश(स.सा.क्र.१) याचे साक्षीतून आरोपी याने त्याला हाताचे थापटाने मारहाण करुन तसेच एक लाकडाची रिप घेवून फिर्यादीचे उजवे कानाचे पाठीमागील बाजूस तसेच डोक्यावर, डाव्या हताचे मनगटावर मारहाण केली असे संशयापलीकडे सिध्द होत नाही. तसेच सदरकामी फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान झालेली तडजोड लक्षात घेता, अभियोग पक्षातर्फे अन्य साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली नाही. पर्यायाने, आरोपीचे विरुद्धचा गुन्हा अभिलेखावर निःसंशयरित्या शाबित होत नाही. सबब, संशयाचा फायदा मिळणेस आरोपी पात्र आहे. यास्तव, वरील सर्व पुराव्याचे विवेचनावरुन मुद्दा

क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतात.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत</u>** : –

**११.** मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविलेले आहेत. अभियोगपक्षाने आरोपीस सिध्ददोषी ठरविण्यासाठी सबळ व संयुक्तिक असा पुरावा सादर केलेला नाही. या कारणास्तव, आरोपीला भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे.

**१२.** प्रस्तुत प्रकरणात तपासी अधिकारी यांनी एक २ फुट ०३ इंच लांब लाकडी फळीचा रीपचा तुकडा तीन बाजू समान ०३ इंच मापाच्या एका बाजुचा तुकडा मध्यभागी तुटलेला जुना वापरता असा मुद्देमाल जप्त केलेला आहे. सदरचा मुद्देमाल हा मुल्यहीन असल्याने तो अपिल कालावधीनंतर तो नाश करणे योग्य व संयुक्तिक होईल. सबब, मी मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षाप्रित्यर्थ खालीलप्रमाणे आदेश पारित करतेः–

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **कुंदन नंदकुमार चव्हाण** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांच्या आरोपातून निर्दोष मुक्त करणेत येते.

२. आरोपीचा जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतो.

३. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल नामे एक २ फुट ०३ इंच लांब लाकडी फळीचा रीपचा तुकडा तीन बाजू समान ०३ इंच मापाच्या एका बाजुचा तुकडा मध्यभागी तुटलेला जुना वापरता हा मुल्यहीन असल्याने तो अपिल कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ या सुधारित कलमांचा विचार करता आरोपीला असे आदेशीत करण्यात येते की, आरोपीने रु.१५०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व त्याच रक्कमेचे जामीन बंधपत्र द्यावे. सदरचे जामीन बंधपत्र हे सहा महिन्याच्या कालावधीसाठी अंमलात राहिल.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात घोषित.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VAISHALI VINAYAK PATIL
Date: 2026.08.10 17:06:50 +0530

**ठिकाण – रत्नागिरी.** **(व्ही. व्ही. पाटील)**

**दिनांक – १०/०८/२०२६** **मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.**

# -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file Judgment are same word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M. N. Patil |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 10/08/2026 |
| Judgment signed by P.O. on | :- | 10/08/2026 |
| Judgment uploaded on | :- | 10/08/2026 |